**<u>नियमीत दरखास्त क्र.२५/२०१५ मधील नि.४९ खालील आदेश</u>**
(सौ.आक्काताई आनंदा गायकवाड वगैरे वि. आनंदा पांडुरंग गायकवाड)

१. अर्ज व म्हणणे वाचले. धनकोतर्फे विधिज्ञ श्री.एन.एस.पाटील व ऋणको तर्फे विधिज्ञ श्री.पी.ए.महाजन यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, यापुर्वी धनको यांनी नि.क्र.२१ अन्वये दाखल केलेला प्रस्तुत अर्जात नमूद कारणास्तव न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करुन त्यांचेमार्फत दावा मिळकतीतील ऊस पीक कारखान्यास गाळपासाठी पाठविणेबाबतचा अर्ज मंजूर करणेत आलेला आहे व त्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्तांचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या दरखास्तीतील येणे रक्कमेची अदयाप पूर्ण वसुली झालेली नाही. सबब, सदर अर्जातील नमूद मजकूराचा व निशाणी क्र.२१ वरील आदेशाचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अ) सदरचा अर्ज निशाणी क्र.२१ वरील आदेशाप्रमाणे मंजूर करणेत येतो.

ब) न्यायालयीन आयुक्त म्हणून विधीज्ञ श्री. ए.ए.बच्चे-पाटील यांची नेमणुक करणेत येत आहे.

क) न्यायालयीन आयुक्तांनी मौजे माळवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील भू.गट नं१२८८, १३८८ व ९११ या मिळकतीमधील ऋणको आनंदा पांडुरंग गायकवाड व त्यांची आई हिराबाई पांडुरंग गायकवाड व ऋणकोच्या बहिणी नामे आक्काताई सर्जेराव पाटील व मंगल दगडू पाटील यांचे समाईकातील अनुक्रमे १८, २२.४० व १८.२० गुंठे क्षेत्रातील ऊस मजुरामार्फत तोडणी करुन तो ऊस सदर अर्जात नमूद श्री.दत्त सहकारी साखर कारखाना (दालमिया भारत शुगर लिमिटिडे, शाखा आसुर्ले-पोर्ले) येथे आपले नांवे गाळपासाठी पाठवावा व सदर ऊस बिलाचे रक्कमेपैकी ऋणको याचे १/४ हिस्याची रक्कम धनको यांचे पोटगीचे रक्कमेपोटी न्यायालयात जमा करावे. ऊस बिलातील ऋणको याचे हिस्से व्यतिरिक्त उर्वरीत ३/४ हिस्सेची रक्कम ऋणको याची आई हिराबाई पांडुरंग गायकवाड व ऋणकोच्या बहिणी नामे आक्काताई सर्जेराव पाटील व मंगल दगडू पाटील यांना प्रत्येकी १/४ प्रमाणे देणेत यावी व त्याबाबतचा अहवाल आजपासून तीस दिवसांचे आत अभिलेखावर दाखल करावा.

ड) न्यायालयीन आयुक्तांनी श्री.दत्त सहकारी साखर कारखाना (दालमिया भारत शुगर लिमिटिडे, शाखा आसुर्ले-पोर्ले) यांना ऊस तोडणी बाबतची कल्पना देवून कारखान्याला ऊस

पोहचवण्याची पूर्तता करावी.

इ) धनको यांनी न्यायालयीन आयुक्तांचे खर्चापोटी प्राथमिक शुल्क म्हणून रुपये ३,०००/- आजपासून सात दिवसांचे आत न्यायालयात जमा करावे.

ई) विधिज्ञ श्री.ए.ए.बच्चे पाटील यांना सदर कामी त्यांची नेमणुक न्यायालयीन आयुक्त म्हणून झालेबाबत न्यायालयासमक्ष सांगण्यात आले आहे.

उ) धनको यांनी न्यायालयीन आयुक्तांचे शुल्क भरलेनंतर व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर कमिशनपत्र पाठवणेत यावे.

दिनांक ०६/१२/२०१७
पन्हाळा.

स्वाक्षरी/-
(वि. आ. अवघडे)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

<u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्रातील मजकूराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | श्री. अ. आ. पाटील |
| न्यायालयाचे नांव | श्री.वि.आ.अवघडे |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | ०६/१२/२०१७ |
| न्यायिक अधिका-यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ०६/१२/२०१७ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ०६/१२/२०१७ |